# मिरा भाईंदर महानगर पालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

## मिरा भाईंदर महानगरपालिकेतील 'Center of Excellence in Education' उपक्रमाबाबत आढावा बैठक

Center Of Excellence In Education या उपक्रमाबाबत आढावा बैठक दिनांक 14 नोव्हेंबर 2024 रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालयात घेण्यात आली. या बैठकीत मिरा भाईंदर महानगरपालिकेचे मान्यवर आयुक्त तथा प्रशासक श्री. संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.), अतिरिक्त आयुक्त श्री. अनिकेत मानोरकर आणि शहर अभियंता श्री. दिपक खांबित यांची प्रमुख उपस्थिती होती.

या उपक्रमाचा उद्देश मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविणे असून यासाठी सामाजिक संस्थांचा समावेश करून घेण्यात येईल तसेच मिरा भाईंदर मधील सर्व शाळेतील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रभावी कार्यक्रम राबविण्याबाबत विशेष चर्चा करण्यात आली आहे. सामाजिक संस्थेच्या प्रतिनिधींसोबत सविस्तर संवाद साधून, या उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी आवश्यक त्या उपाययोजनांचा विचार केला गेला आहे. प्रत्येक मान्यवरांनी आपआपल्या परीने विविध कल्पक विचार यावेळी व्यक्त केले तसेच 'Center of Excellence in Education' उपक्रमाच्या विविध पैलूंवर चर्चा केली आणि यशस्वी राबवणीसाठी ठोस उपयुक्त अशी दिशा ठरवली आहे . या उपक्रमात सामाजिक संस्थांची सक्रिय सहभाग असणे खरच खूप महत्त्वपूर्ण ठरेल, जेणेकरून विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता सुधारेल आणि त्यांना उत्कृष्ट शिक्षणासोबत उज्वल भविष्याचा नवा राजमार्ग मिळेल.